I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 239-242
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोविड – 19 आणि शिक्षण

R. S. Pattiwar
Janata Shikshan Mahavidyalaya, Chandrapur
*Corresponding Author: ashishsgade@gmail.com

**सारांश :**

कोविड–19 या साथीच्या रोगाने संपूर्ण जग ग्रासलेले आहे. एकाच वेळेला एकाच कारणासाठी संपुर्ण जगाची अर्थव्यवस्था, दळणवळण व्यवस्था, शिक्षण व्यवस्था ठप्प पडल्याची मानवी आयुष्यात प्रथमच घडल्याचे दिसून आले. मानवाच्या सर्वच क्षेत्राबरोबर शिक्षण क्षेत्रही त्यात प्रभावित झालेले दिसून येत आहे. शिक्षण क्षेत्राला पुन्हा उभारी देण्याच्या दृष्टीने मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ न देता किंवा कमीतकमी नुकसान होऊन ती पुर्वपदाला येण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात आहे. त्यात ऑनलाईन शिक्षण ही महत्वपूर्ण व सामाजिक अंतर ठेवून अंमलात आणावयाची उपयायोजना होय. ही पध्दती जितकी आकर्षक व उपयोगाची दिसून येते तितकीच दुसऱ्या बाजुला अनेकांना शिक्षण व्यवस्थेतुन दुर करणारी दिसून येते. त्याचे चांगले परिणाम आहेत तसेच मर्यादाही फार महत्वाच्या आहेत याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

## प्रस्तावना :

दुसऱ्या महायुध्दानंतर मानवी जीवनाच्या सर्वच बाजुला व्यापून टाकणारे संकट म्हणून कोरोना विषाणूव्दारे होणाऱ्या कोविड–19 च्या जागतिक साथीला बघावे लागेल. आजपर्यंत मानवाच्या उत्क्रांती नंतर प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यात मानवाला अनेक संकटांचा सामना करावा लागला. त्यात मानव निर्मित संकटे, नैसर्गिक संकटे अशी अनेक प्रकारची संकटे आली परंतु ती काही भूभागापुरते मर्यादित होती तर काही देशांपूरते मर्यादित होती. काही संकटे ही काही खंडांपूरते मर्यादित होती. तरी देखील या संकटांनी मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्राला प्रभावीत केलेले दिसून येत नाही. सध्याच्या परिस्थितीत आलेले कोविड 19 या विषाणूजन्य आजाराचे संकट हे पृथ्वीतलावरील अखिल मानव जातीला अस्तित्वाचा प्रश्न पडावा इतका गंभीर बनलेला आहे. हे प्रत्येक दिवशी अनुभवायला येत आहे.

कोविड – 19 चे संकट फार मोठे आहे. इतर रोगांपेक्षा त्याच्या संक्रमणाच्या प्रकारामुळे त्याचा प्रसार फार मोठया प्रमाणात होत आहे. त्यातुन त्यावर प्रतिजैविक औषधे न सापडल्यामुळे जगात भीतीचे वातावरण आहे. जगातल्या प्रदुषणाची पातळी प्रचंड पैसा व प्रयत्न करून देखील कमी झाली नव्हती ती करोनाच्या जगभरातील फक्त काही दिवसाच्या लॉकडाऊन मुळे घडूण आली या वरून जगातला मानवी व्यवहार हा किती ठप्प पडला होता हे दिसून येते. याच पार्श्वभूमीवर बंद पडलेल्या अर्थव्यवस्थेमूळे रोज काम करून पोटाची खळगी भरणाऱ्या कष्टकरी लोकांचे हाल, काम नसल्यामुळे शहराकडून गावाकडे निघालेले हजारो लोकांचे तांडे, थांबलेली अर्थचक्रे, स्वतःचा जीव धोक्यात घालुन या सर्वांना मदत करणारे लोक, या काळात दिसणाऱ्या विविध मानवी प्रवृत्ती, उदया काय ? या विवंचनेत असलेला मानव, इतक्या अस्थिर वातावरणात जगभरातील मानव

जातीला कोणीही बघीलते नसेल. इतक सारे असले तरी जीवनाचे रहाटगाडग हे चालुच ठेवायला हव यात काही वादच नाही. फक्त त्यातील प्राधान्यक्रम कोणता हे ठरवता यायला हवा. आरोग्य, अर्थ, या बरोबरीने शिक्षणाचा देखील विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**कोविड 19 चा प्रभाव**

जगभरात कोरोनाला रोखण्यासाठी शैक्षणिक संस्था बंद करण्यात आल्या आहे. शिक्षण क्षेत्रातल्या सर्वच क्रियाकलाप थांबलेल्या आहे. एका अहवालानुसार या कोविड – 19 काळात जगातल्या 188 देशातील 154 कोटी विद्यार्थी घरी बसलेले आहेत. तर भारतात देखील जवळपास पंधरा लाख शाळा बंद असून त्यात शिकणारे सर्व स्तरातील 26 कोटी विद्यार्थी व त्यांना अध्यापन करणारे 90 लक्ष शिक्षक घरी आहेत. वरवर बघता ही एक आरोग्य विषयक समस्या असे वाटत असले तरी या संकटाला शिक्षण विषयक बाजु देखील आहे हे मान्य करावेच लागेल. भारताचे भविष्य हे शाळांमधून निर्माण होत असते असे म्हणतात आणि हे सत्य देखील आहे. तेव्हा शैक्षणिक संस्था ठप्प पडल्यामुळे त्यातुन विद्यार्थ्यांच्या भविष्याचे काय ? याची विवंचना समस्त लोकांना लागुन राहिली आहे. त्यात विद्यार्थी, पालक, राज्यकर्ते, समाज व त्यावर अवलंबून असलेले अनेक घटक आहे. या पार्श्वभूमिवर लॉकडाऊन काळात मुलांचे आरोग्य चांगले राहावे, कोरोनाच्या प्रभावापासून त्यांचे रक्षण करणे त्याच बरोबरविद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही याची काळजी घेणे महत्वाचे ठरते. त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर हा महत्वपूर्ण उपाय ठरतो.

**अध्ययन अध्यापनासाठी तंत्रज्ञानाचा वापर**

कोरोना काळात शाळा महाविद्यालये बंद आहेत. शाळा केव्हा उघडणार या बाबतची अनिश्चितता सर्व्त्र पसरली आहे. या आजाराचे स्वरूप हे मानवातुन मानवाला संक्रमण करणारे असल्यामुळे नजिक भविष्यात पुर्ण क्षमतेने शाळा सुरू होणार नाही याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे ऑनलाईन शिक्षणाचा जोरदार विचार सर्वत्र चालु आहे. स्वतः शासनाचा विचार देखील त्याच बाजुने असल्याचे दिसून येत आहे. केंद्र शासनाचा मानव संसाधन विकास विभाग, राज्य शासनाचे आपआपले शिक्षण विभाग हे त्या दृष्टीने प्रयत्नरत आहे. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर ऑनलाईन शिक्षणासंबधीच्या मार्गदर्शक सुचना देखील प्रकाशित केल्या गेल्या. तसेच त्यासाठी लागणाऱ्या संसाधनांच्या उपलब्धीबाबतचा अभ्यास देखील सुरू आहे.

मानव संसांधन विकास विभागाने ऑनलाईन शिक्षणाच्या चार संभाव्य पध्दती सांगितल्या आहे त्या–

- पूर्ण ऑनलाईन ज्यात ऑनलाईन तासिका असतील व चर्चा होतील
- अंशतः ऑनलाईन ज्यात साहित्य ऑनलाईन पाठविले जातील व त्यावर ऑफलाईन कार्य होईल
- दूरदर्शन च्या माध्यमातून वर्गवार व विषयवार अध्यापन होईल
- रेडिओच्या माध्यमातून वर्गवार व विषयवार अध्यापन होईल

या साठी इंटरनेट, स्मार्ट फोन, कॅम्पूटर, लॅपटॉप, मोबाईल फोन, दूरदर्शन, या सर्व हार्डवेअर चा वापर करून अध्यापनाचे कार्य करणे होय. शिक्षणापासून मुलांना वंचित राहावे लागु नये म्हणून युनेस्कोने दूरशिक्षण, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, यु–टयुब, हॅगऑउट, मल्टीमिडिया, ई लायब्ररी, स्वयंमप्रभा, इत्यांदींच्या माध्यमातून तातडीने शिक्षण सुरू करावे असे म्हटले आहे. त्यानुसार खाजगी शाळा, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, तंत्रशिक्षण महाविद्यालये, वैद्यकिय महाविद्यायलये, काही राज्यांतील सरकारी शाळा, यांनी आपले अध्यापन कार्य सुरू देखील केलेले आहे. त्यात–

- ऑनलाईन अध्यापनासाठी युटयुब वर व्हिडीओ टाकून त्याची लिंक विद्यार्थ्यांना पाठवून तो बघायला सांगतात. त्यानंतर व्हाटसअप या समाज माध्यमाचा वापर करून विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविल्या जातात.
- अनेक ॲपस् ज्यात मायक्रोसॉफ्ट टिम, झुम, या सारख्या ॲपसूचा वापर करून पुर्ण ऑनलाईन तासिका सुरू आहेत व त्यावर तात्काळ चर्चा देखील होऊन विद्यार्थ्यांच्या समस्या तेव्हाच्या तेव्हा सोडविल्या जातात.
- स्वयंप्रभा हे केंद्रशासनाने विद्यार्थ्यांसाठी तयार केलेली दूरदर्शनची वाहिनी असून त्यात विविध अभ्यासक्रमासाठी दररोज अत्यंत दर्जेदार अध्यापकांच्या तासिका प्रसारीत केले जातात त्याचा उपयोग विद्यार्थी करतात.

अश्या अनेक पध्दतीने ऑनलाईन अध्ययन अध्यापनाचे कार्य संपूर्ण भारतात सुरू आहे. या माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचा विस्तार होत आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षकांचा लाभ घेता येत आहे. ज्या विद्यार्थ्यांना चांगल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता होती ती या पध्दतीच्या अध्यापनामुळे ती पुर्णत्वास येत आहे. या माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचा दर्जा, शिक्षणाचा प्रसार, शिक्षणाच्या संधी वाढविण्यास भरपूर वाव आहे.

**ऑनलाईन अध्यापनाच्या मर्यादा–**

- सध्या सुरू असलेल्या ऑनलाईन शिक्षण पध्दतीमध्ये अनेक अडचणी दिसून येत आहे. त्यात,
- सरकारी, खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांजवळ पुर्णवेळ स्मार्ट फोनची उपलब्धता दिसून येत नाही.
- इंटरनेट जुळणी च्या समस्येला प्रत्येकालाच भेडसावत असते.
- भारताच्या ग्रामीण भागात इंटरनेटची अनुपस्थिती.
- आर्थिक समस्यांमुळे प्रत्येक व्यक्ती इंटरनेट चा वापर करू शकत नाही
- ग्रामीण भागात विजेची प्रचंड प्रमाणात समस्या, अनेक गावात विज पोहचली नाही तिथे या शिक्षणाचा गंध देखील नाही.

सर्वच शिक्षक हे तंत्रज्ञानस्नेही नाहीत त्यांना योग्य प्रशिक्षणाची गरज आहेत.

ऑनलाईन शिक्षण कितीही चांगली असेल, त्याचे फायदे भरपूर असेल, तरीही भारतासारख्या भौगोलिकदृष्टया, सामाजिकदृष्टया, आर्थिकदृष्टया, प्रचंड तफावत असलेल्या देशात याचा वापर सर्वसमावेशक असूच शकत नाही. ‘सर्वांसाठी शिक्षण’ हे आमचे ब्रिद वाक्य असतांना आमचे तंत्रज्ञान हे भारताच्या कानाकोपऱ्यात पोहचू शकत

नाही ही वस्तुस्थिती आहे. 'ट्राय' या अहवालानुसार भारतात मोबाईल वापरणाऱ्यांची संख्या जवळपास 49 कोटी इतकी आहे तर इंटरनेट सह स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्या ही चाळीस कोटी च्या आसपास आहे. ही संख्या जरी प्रचंड वाटत असली तरी अर्ध्यापेक्ष्या जास्त लोकांच्या ती आवाक्या बाहेर आहे हेच सिध्द होते. म्हणजेच अर्धी लोकसंख्या किंवा विद्यार्थी हे या प्रकारच्या शिक्षणापासून वंचित राहु शकतात म्हणजेच ही मुले शिक्षणाच्या प्रकियेतुनच बाहेर पडेल हे कोणीही नाकारणार नाही. दुरदर्शन बघणाऱ्या भारतीयांची संख्या ही जवळपास 76 कोटींच्या घरात आहे. परंतु स्वयंप्रभा सारख्या वाहिन्या सोडल्यातर फक्त शिक्षणाला वाहिलेल्या वाहिण्यांची भारतात वानवाच आहे. कोविड – 19 च्या प्रभावामुळे आता ही गरज निर्माण झाली आहे. तेव्हा याची पुर्तता होण्यासाठी अनेक वर्षे जावी लागेल. विविध विषय, अनेक वर्ग, अनेक अभ्यासक्रम, अनेक भाषा, त्यांना लागणारा तज्ञ व तंत्रज्ञान स्नेही शिक्षकवर्ग, पारंपारीक अभ्यासक्रम व ऑनलाईन अभ्यासक्रम यातील फरक, तो तयार करण्यास लागणारा वेळ, या उपर अश्या पध्दतीने शिकण्यासाठी विद्यार्थ्याला या सर्व गोष्टींसोबत जुळवून घेण्यासाठीची मानसिक तयारी अश्या अनेक अडचणींचा डोंगर शिक्षण क्षेत्रासमोर प्रथमच आलेला आहे. कोरोनोत्तर काळात हया सर्व गोष्टींचा विचार करून नविन शिक्षण पध्दती अंमलात येईल जी कोणत्याही परिस्थितीत सर्वसमावेशक असेल असा विश्वास व्यक्त करता येईल.

**संदर्भ**

राजश्री तिखे, ऑनलाईन शिक्षणाचा उहापोह, द वायर, मराठी, दि. 17 जून 2020